# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- २५/१२/२०१८

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेत ग्रामीण पोलीस दलातील पैलवान विजय सुरूडे व सागर बर्डे यांना ''कांस्यपदक''

---

नाशिक ग्रामीण पोलीस दलातील कुस्तीपट्टू यांनी प्रतिष्ठेच्या मानल्या जाणा-या **''महाराष्ट्र केसरी''** स्पर्धेत **''कांस्यपदक''** पटकावुन यश संपादन केले आहे. जालना जिल्हयात यंदाची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील कुस्तीपट्टू पैलवान **विजय सुरूडे** व पैलवान **सागर बर्डे** यांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धे दरम्यान **७४ किलो** वजनी गटात पै. विजय सुरूडे यांनी यश संपादित करून **कांस्यपदक** पटकाविले, तर **६१ किलो** वजनी गटात पै. सागर बर्डे यांनाही **कांस्यपदक** मिळाले.

नाशिक ग्रामीण पोलीस दलातील कुस्तीपट्टू पै. विजय सुरुडे व पै.सागर बर्डे यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून नाशिक ग्रामीण पोलीस दलासह महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे नावलौकिक केलेले आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणारे वरील दोन्हीही खेळाडुंचे **मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी अभिनंदन करून भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करावी यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच ग्रामीण पोलीस दलाचे अपर पोलीस अधीक्षक **श्री. निलोत्पल सो.**, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय श्री.सुरेश जाधव, राखीव पोलीस निरीक्षक श्री. अशोक रत्नपारखी, रापोउनि साहेबराव जाधव व क्रिडा पोलीस प्रशिक्षक श्री. समाधान गवळी यांनीही दोन्ही खेळाडुंचे अभिनंदन केले.

---